संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

ही तर विकृतीची राजधानी

इतिहासकाळापासून पुणे महानगराबाबत वापरल्या जाणाऱ्या सगळ्या विशेषणांवर पूर्ण पाणी फिरवले गेले आहे. ज्या पुणे जिल्ह्यात इतिहासातील शौर्याने दुर्दम्य शक्तीचे दर्शन घडवले होते. तर त्याच इतिहासकाळापासून अनेक सुधारणावादी किंवा प्रबोधनाच्या चळवळी सुरू असणारे एक प्रमुख केंद्र म्हणूनही पुण्याची ओळख होती. विद्येचे माहेरघर किंवा एक सांस्कृतिक राजधानी म्हणूनही पुण्याचा नेहमीच नावलौकिक सांगितला जात असतो. ही सगळी नावलौकिक सांगणारी विशेषणे आता नेस्तनाबूत करण्याचे उद्योग पुण्यात जोरदार सुरू आहेत. ते आता विद्येचे माहेरघर राहिले नसून मादक पदार्थ, ड्रग्ज, मेफेड्रोनच्या पावडरींचा आहेर मिळणारे घर झाले आहे. ही सांस्कृतिक राजधानी केव्हाच विलयाला गेलेली दिसते. ती आता विकृतीची राजधानी म्हणूनच ओळखावी लागेल. इतके भयानक आणि चित्रविचित्र प्रकार पुण्यात रोज पाहायला मिळत आहेत. गेल्या वर्षभरापासून तर पुण्यातल्या चौकाचौकात किंवा गल्लीबोळात ड्रग्ज आणि मादक पदार्थ, दारूची दुकाने, पब, बार यांची जत्रा भरल्यासारखी स्थिती आहे. पुण्यातल्या नव्या पिढीला पुण्यात ज्या काही जुन्या ओळखीच्या खुणा होत्या. त्यादेखील नव्या पिढीच्या विस्मरणात गेलेल्या आहेत. ड्रग्ज मिळण्याची ठिकाणे, हॉटेल, पब, मॉल, यांच्या नव्या खुणाच अधिक परिचयाच्या झाल्या आहेत. जसे पुण्यामध्ये पत्र्या मारूती, खुन्या मुरलीधराचे देऊळ, शनिवारवाडा, अशी काही ठिकाणे सर्वांच्याच माहितीतली आणि परिचयाची होती. त्याच्या जागी आता लिक्वीड लाऊंज, एल थ्री बार, वेगवेगळे मॉल अशा ठिकाणांची चलती आहे. पुण्याच्या प्रसिद्ध ससून रुग्णालयात ड्रग्जची विक्री करण्याचे प्रकार उघडकीला आले. ललित पाटील प्रकरण म्हणून ते प्रचंड अजूनही गाजते आहे. महाविद्यालयांपासून ते रुग्णालयांपर्यंत किंवा गडकिल्ल्यांपासून ते गल्लीबोळापर्यंत सर्व प्रकारची नशा करण्यापर्यंत दौलतजादा प्रवृत्ती धुमाकूळ घालताना दिसते. त्यात भरीस भर म्हणून कोयता गँग, तलवार गँग यांची दहशतही पुण्यावर वचक ठेवून आहे.

ड्रग्जचे अड्डे

फार वर्षांपूर्वी पुण्यातल्या आता शिवाजी नगर असलेल्या भागाचे नाव भांबुर्डे असे होते. परंतु हे नाव बदलून शिवाजी नगर करावे अशी मागणी झाली. असे म्हणतात की, आचार्य अत्रेंनी ही मागणी केली होती. हा परिसर शेती आणि तत्सम निसर्गाने संपन्न असताना भांबुर्डे हे नाव शोभत नाही. म्हणजेच पुणे आणि पुण्याच्या परिसराचा विचार करताना तिथल्या वेगवेगळ्या प्रकारच्या संपन्नतेचा नेहमीच सन्मान केला गेला. कारण त्यातल्या अनेक गोष्टींशी इतिहास जोडला गेलेला होता. परंतु आता त्या संपन्नतेचे पुण्याला पूर्णपणे विस्मरण झाले असावे असे दिसते. आणि तिथे विपन्नतेचे ग्रहण लागलेले दिसून येते. विपन्नता याचा अर्थ केवळ आर्थिकदृष्ट्या गरिबी असा नसून एकूणच तिथे वाढलेल्या विकृतींचा विचार केला तर ते एक सामाजिकदृष्ट्या दारिद्र्यच म्हणावे लागते. तीच ही विपन्नता आहे. मोठ्या अभिमानाने सांगितले जाणारे पुण्याचे कौतुक या सगळ्या चित्रविचित्र घटनांमुळे बरबटले जाते आहे. आता हे महानगर सांस्कृतिक राजधानी राहिली नसून विकृतीची राजधानी होते आहे. वेगाने तिथल्या समाजव्यवस्थेची होत असलेली घसरण निश्चितच चिंताजनक ठरते. कारण केवळ महाराष्ट्रच नव्हे तर देशाच्या कानाकोपऱ्यातून शिक्षणासाठी येणारी नवी पिढी ड्रगच्या घातचक्रामध्ये भरडली जाते आहे. हे प्रकार पुण्यात सातत्याने होण्याचे कारण म्हणजेच दरवर्षी पुण्यात बाहेरून येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या दीड ते दोन लाखांच्या घरात असते. अशा या विद्यार्थ्यांना टार्गेट करून ड्रग किंवा मादक पदार्थांच्या या माफिया टोळ्या या तरुण पिढीचं खच्चीकरण करीत आहेत. तिथल्या ताज्या लिक्वीड लाऊंज या हॉटेल प्रकरणात चार पोलिसांचे झालेले निलंबन आणि उत्पादन शुल्क विभागाच्या एका अधिकाऱ्यावर झालेली कारवाई अशासाठी महत्त्वाची ठरते की, आपल्या कर्तव्यात कसूर करणाऱ्यांना जितक्या तातडीने शिक्षा होईल. तितकी पुण्यातली परिस्थिती सुधारू शकेल. म्हणजे तलवार किंवा कोयता गँगचा धुमाकूळ पाहिल्यानंतर कायदा सुव्यवस्था राबवणाऱ्या वर्दीचाही धाक त्यांना राहिलेला नाही. पण वर्दीलाही सरकारचा धाक राहिलेला नाही हेदेखील तितकेच खरे आहे.

पुण्यातल्या चळवळी कुठे गेल्या?

गुन्हे करणारे अशा बेजबाबदार अधिकाऱ्यांमुळेच सोकावतात. या विकृतीपासून पुण्याला वाचवायचे असेल तर कायद्या सुव्यवस्थेबरोबरच तिथल्या समाज व्यवस्थेलाही पुढाकार घ्यावा लागेल. एरवी छोट्या मोठ्या मुद्यांवरून सुधारणा चळवळी चालवणारे अनेक प्रबोधनाचे मंच तिथे आहेत. पण त्या चळवळीसुद्धा पुण्याच्या या घसरणीला रोखण्यासाठी पुढाकार घेताना दिसत नाहीत. आज शेकडो शिक्षण संस्था पुण्यात आहेत. या सर्व शिक्षण संस्थांनी एकत्र येऊन जरी या मादक पदार्थांविरोधात संघटितपणे जनजागृती केली तरीसुद्धा खूप मोठा परिणाम दिसून येऊ शकतो. परंतु या शिक्षण संस्थाही सध्या फक्त पैसा कमावण्यात मश्गूल आहेत. भरमसाठ शुल्क आणि भरमसाठ देणग्या गोळा करण्यावरच त्यांचे लक्ष असते. आपल्या शिक्षण संकुलाबाहेर आपल्या संस्थेच्या बाहेर विद्यार्थी काय करतो याचे त्यांना घेणे-देणे उरलेले नसते. याशिवाय पुण्यातल्या गुन्हेगारीकरणाचे झालेले राजकीयकरणसुद्धा आता धोकादायक पातळीवर गेले आहे. गुन्हेगारांना वाचवण्यासाठी धडपडणारे स्थानिक राजकारणी शिवाय तिथल्या गुंडांच्या आणि अवैध धंदे करणाऱ्यांच्या संगनमतातून शेकडो हॉटेल्स, पब अशा विकृतींचे अड्डे झालेले आहेत. याचा अर्थ तिथल्या राजकीय क्षेत्राचीदेखील नशा उतरवण्याची आवश्यकता आहे. गेल्या वर्षभरातला मादक पदार्थ आणि अन्य गुन्हेगारीचा चढता आलेख म्हणजे पुण्याच्या प्रतिष्ठेला लागलेले कायमचे नखच म्हणता येईल. केवळ आदेशांचे किंवा चौकशांचे कागदी घोडे नाचून या समस्या सुटणार नाहीत. दोषींवर कठोर कारवाई आणि स्थानिक लोकांची जनजागृती हेच त्यावरचे प्रभावी उपाय ठरतात.

सुविचार

विलास कोळेकर
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

समोरच्याला आदर देणं ही सर्वात मोठी भेट असते आणि समोरच्याकडून आदर मिळविणे हा सर्वात मोठा सन्मान असतो.

पंचांग

बुधवार २६ जून, २०२४
शक १९४६ क्रोधीनामसंवत्सर

ज्येष्ठ कृष्ण पंचमी
नक्षत्र : धनिष्ठा



-: जन्मराशी :-
००-०१ ते ०१-४९ मकर
०१-५० ते २४-०० कुंभ

रवी उदय- ०६-०५
रवी अस्त- १९-१८

राजर्षी शाहू महाराज जयंती, सामाजिक न्याय दिन, मादक पदार्थ विरोधी दिन

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफिस आणि नवाकाळ प्रेस करिता १) दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८. २) एलिगंट ऑफसेट प्रिंटर्स प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं.एफ ७-१ आणि एफ ७-२/२, एमआयडीसी, शिरोली इंडस्ट्रीयल एरीया, शिरोली गाव, ता.हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर - ४१६१२२ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे**

संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेल navakal.1923@gmail.com
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक
'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at 1) Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. . 2) Elegant Offset Pvt. Ltd., Address : Plot No.F7-1 & F7-2/2, M.I.D.C., Shiroli Industrial Area, Village Shiroli, Tal. Hatkanagle, Dist Kolhapur-416122. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande**

कविता...

निर्दयीपणाचा कळस

निर्दयीपणाने गाठला असे
या जगतात उंच कळस
भर दिवसा असे रस्त्यात
खून, दरोडे, हत्याचा पळस
मिळताच अशा घटनांची
बघ्या, आणि टघ्याना वर्दी
क्षणात घटना स्थळी दिसे
फक्त या बघ्यांचीच गर्दी
प्रसंग चित्रीकरण करण्याची
या बघ्याना असते घाई
पण हत्या रोखण्यासाठी
धजत नाही पुरुष-बाई
हाती असेल ते अवजार
सपासप असती ते वार
किती दुर्दैवी असे ही
निर्दयतेची दुर्दैवी धार
प्राण गेले तरीही असे
निर्दयतेची हा मारा
यापुढे गोठून जातो
माणुसकीचा पारा
निर्दयी असे समाज
निर्दयी असे सरकार
निर्दयीपणाचा दिसे
सर्वत्र हा कारभार
मुलींनी घ्यावा धडा
अशा घटनेपासून
प्रेम प्रकरणाची पाऊले
उचलावी जरा जपून
उचलावी जरा जपून

• धोंडिरामसिंह ध राजपूत •
न्यू सन्मित्र कॉलोनी, लाडगाव रोड, वैजापूर-४२३७०१
जि, औरंगाबाद मो.९४२१३१२२४४.

भारताने ऑस्ट्रेलियाला वर्ल्डकपमधून बाहेर घालवले बांगलादेशचा पराभव करून अफगाणिस्तान उपांत्य फेरीत

यंदाच्या टी-२० वर्ल्डकपमध्ये बलाढ्य ऑस्ट्रेलियावर सुपर ८ फेरीतच गारद होण्याची नामुष्की ओढवली आहे. सोमवारी भारताने ऑस्ट्रेलियाचा पराभव करून त्यांचे वर्ल्डकपमधले आव्हान संपुष्टात आणले. तर आज अफगाणिस्तानने बांगलादेशचा पराभव करून वर्ल्डकपच्या इतिहासात प्रथमच उपांत्य फेरी गाठली आहे. त्यामुळे पहिल्या उपांत्य फेरीत भारत विरुद्ध इंग्लंड तर दुसऱ्या उपांत्य फेरीत द. आफ्रिका विरुद्ध अफगाणिस्तान यांच्यात लढत होईल.

■ न्यूयॉर्क

सोमवारी भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया यांच्यातील सामन्यात भारताने प्रथम फलंदाजी करताना ऑस्ट्रेलियासमोर २०५ धावांचे लक्ष ठेवले होते. पण ऑस्ट्रेलियाचा संघ १८१ धावांत तंबूत परतला आणि भारताने २४ धावांनी सामना जिंकून दिमाखात उपांत्य फेरीत प्रवेश केला. दरम्यान आज सुपर ८ मध्ये अफगाणिस्तान विरुद्ध बांगलादेश यांच्यात लढत झाली. अफगाणिस्तानने प्रथम फलंदाजी करताना चांगली सुरुवात केली. बांगलादेशच्या रिशाद होसेनने गुरबाज ४३ व जदरान १८ या सलामीच्या जोडीला तंबूत धाडले.

या जोडीने ५९ धावांची भागीदारी केली, पण गुलबुद्दीन नैब ४ व मोहम्मद नबी १ यांना अपयश आले. रशीद खानने नाबाद १९ धावा केल्या. त्यामुळे अफगाणिस्तानला २० षटकांत ५ बाद ११५ धावा करता आल्या. या धावसंख्येचा पाठलाग करताना बांगलादेशचा संघ १७.५ षटकात १०५ धावांमध्ये गडगडला. आणि अफगाणिस्तानने ८ धावांनी विजय मिळवून वर्ल्डकपच्या इतिहासात प्रथमच उपांत्य फेरीत प्रवेश केला. अफगाणिस्तानचा कर्णधार रशीद खानने २३ धावांत ४ तर नवीनने २६ धावांमध्ये ४ बळी घेतले. आता शुक्रवारी उपांत्य फेरीत अफगाणिस्तानची दक्षिण आफ्रिकेशी लढत होईल.

भारताच्या दीपांशी व मुस्कान यांचे सुवर्णयश

■ नवी दिल्ली

जॉर्डनमध्ये झालेल्या १७ वर्षांखालील एशियन चैंपियनशिप स्पर्धेत भारताच्या दीपांशी व मुस्कान यां दोन छोट्या पहिलवानांनी सुवर्णदक पटकावले आहे.१७ वर्षांखालील कुस्ती स्पर्धेनंतर आता १९ वर्षांखालील कुस्ती स्पर्धाही होणार आहेत सुवर्णपदक विजेत्या दोन्ही छोट्या पहिलवानांचे त्यांच्या रोहतक येथील निवासस्थानी जोरदार स्वागत करण्यात आले. तसेच त्यांना भविष्यातील त्यांच्या कारकिर्दीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या दीपांशने ४६ किलो वजनी गटात तर मुस्कानने ५३ किलो वजनी गटात सुवर्णपदक पटकावले आहे . जॉर्डनमध्ये २२ ते ३० जून दरम्यान हि स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. दोन वेगवेगळ्या वयोगटातील या स्पर्धेमध्ये अनेक देशांच्या कुस्तीपट्टूनी भाग घेतला होता.

मुंबई पोलिसांकडून टीम इंडियाचे अभिनंदन

■ मुंबई

ऑस्ट्रेलिया विरुद्धच्या सुपर ८ मधील सामन्यात भारताने ऑस्ट्रेलियाचा पराभव करताच सर्वत्र टीम इंडियावर अभिनंदनाचा वर्षाव केला जात होता. यात मुंबई पोलिसांची एक पोस्ट सध्या चांगलीच व्हायरल झाली आहे. मुंबई पोलिसांनी रोहित शर्माचा हसरा फोटो शेअर करत एक पोस्ट लिहिली आहे. जेव्हा तुम्ही 19NOV2023 या जुन्या पासवर्डपासून 24JuN€ @2024 असा अधिक मजबूत पासवर्ड तयार करता!, असं मुंबई पोलिसांनी पोस्टमध्ये लिहिले आहे. या माध्यमातून पोलिसांनी नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. जुना पासवर्ड तर बदलाच वरून त्यात सिम्बोल टाका, असा सल्ला दिला आहे. यामुळे पासवर्ड मजबूत आणि सुरक्षित राहील असे सांगणे आहे. मुंबई पोलिसांनी केलेली ही पोस्ट आता वेगाने व्हायरल होत आहे. या पोस्टखाली अनेकांनी आपल्या प्रतिक्रिया नोंदवल्या आहेत.

फॉर्म जी
करिता स्वारस्याच्या अभिव्यक्तीकरिता आमंत्रण
आराधना रिअल्टीज लिमिटेड

इन्व्हेस्टमेंट आणि फायनान्शियल ॲक्टीव्हीटीजसोबत
मॅनेजमेंट कन्सल्टन्सी सर्विसेस आणि सपोर्ट सर्विसेस पुरवितात
(भारतीय नादारी आणि दिवाळखोरी मंडळ (कॉर्पोरेट व्यक्तीसाठी नादारी विभेदन प्रक्रिया) विनियम, २०१६ च्या विनियमन ३६ए उप विनियमन (१) अंतर्गत)

प्रस्तुत तपशील		
१.	पॅन आणि सीआयएन/एलएलपी क्र. सह कॉर्पोरेट ऋणकोचे नाव	**आराधना रिअल्टीज लिमिटेड** PAN : AABCE0686Q CIN : U70100MH1976PLC034721
२.	नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता	नोंदणीकृत कार्यालय : युनायटेड बिजनेस पार्क, युनिट क्र. २०२, २ रा मजला, प्लॉट ए ४०, रोड क्र. ११, एमआयडीसी, वागळे इस्टेट, ठाणे, महाराष्ट्र - ४००६०४.
३.	संकेतस्थळाचा यूआरएल	लागू नाही
४.	जेथे बहुसंख्य स्थावर मालमत्ता स्थित आहे त्या स्थळाचा तपशील	स्थावर मालमत्ता नाही
५.	मुख्य उत्पादन /सेवांची स्थापित क्षमता	लागू नाही
६.	मागील वर्षामध्ये विक्री झालेल्या प्रमुख उत्पादन / सेवांचे परिमाण आणि मूल्य	कोणतेही थेट उत्पन्न नाही. अंतिम लेखापरीक्षीत ताळे-बंदानुसार २०२१-२०२२ कालावधीसाठी कंपनीचा भा. रू. २.९६ कोटींचा तोटा झाला.
७.	कर्मचारी / कार्मिकांची संख्या	लागू नाही
८.	दोन वर्षांच्या अंतिम उपलब्ध वित्तीय अहवाल समाविष्ट (परिशिष्टासह) पुढील तपशील, धनकोंची यादी यूआरएल येथे उपलब्ध	ईच्छुक व्यक्तींच्या मागणीनुसार आम्ही इलेक्ट्रॉनिक साधनांद्वारे पाठवू.
९.	संहितेच्या सेक्शन २५(२)(एच) अंतर्गत विभेदन अर्जदारांसाठी पात्रता निकष युआरएल येथे उपलब्ध आहेत.	पात्रता अर्हता सविस्तर स्वारस्य अभिव्यक्ती प्रक्रिया दस्तावेजामध्ये नमूद आहेत, जे rp.aaradhanarealties1402@gmail.com/ harishkant2007@gmail.com येथे ईमेल पाठवून प्राप्त करू शकता.
१०.	स्वारस्याची अभिव्यक्ती स्वीकारण्याची अंतिम तारीख	११ जुलै, २०२४
११.	प्रस्तावित विभेदन अर्जदारांची तात्पूर्ती यादी वितरणाची तारीख	१६ जुलै, २०२४
१२.	तात्पूर्त्या यादीला हरकती सादर करण्याची अंतिम तारीख	२१ जुलै, २०२४
१३.	प्रस्तावित विभेदन अर्जदारांची अंतिम यादी वितरणाची तारीख	२६ जुलै, २०२४
१४.	प्रस्तावित विभेदन अर्जदारांना माहिती ज्ञापन, मूल्यांकन मॅट्रीक्स आणि विभेदन योजनेची विनंती वितरणाची तारीख	३१ जुलै, २०२४
१५.	विभेदन योजना सादर करण्याची अंतिम तारीख	३० ऑगस्ट, २०२४
१६.	इओआय सादर करण्यासाठी ईमेल आयडी प्रक्रिया	rp.aaradhanarealties1402@gmail.com

दिनांक : २६/०६/२०२४
स्थळ : मुंबई

आपले नम्र,
हरिष कांत कौशिक
आराधना रिअल्टीज लिमिटेडचे विभेदन व्यवसायिक
नोंदणी क्र : IBBI/IPA-001/IP-P01469/2018-2019/12340
अभिहस्तांकनासाठी २९ नोव्हेंबर, २०२४ पर्यंत वैधता
पत्ता: १०६, १ ला मजला, कनाकिया अॅट्रीयम २, क्रॉस रोड ए, कंट्रीयार्ड मॅरिएटच्या मागे, चकाला, अंधेरी पूर्व, मुंबई - ४०००९३.
ईमेल आयडी : rp.aaradhanarealties1402@gmail.com/ harishkant2007@gmail.com.

ज्योती स्ट्रक्चर्स लिमिटेड

सीआयएन क्र.: L45200MH1974PLC017494
कॉर्पोरेट कार्यालयः वालेचा चेंबर्स, ६ वा मजला, न्यू लिंक रोड, ओशिवरा, अंधेरी (पश्चिम), मुंबई ४०००५३.
ईमेल: investor@jsl.co.in • दूर.: (०१-२२)-४०९१-५००० • वेबसाईट: www.jyotistructures.in

कंपनीच्या इक्विटी भागधारकांना सूचना

गुंतवणुकदार प्रशिक्षण आणि संरक्षण निधी (आयईपीएफ) खात्यामध्ये समभागांच्या हस्तांतरणासंबंधी

कंपनी कायदा, २०१३च्या कलम १२४(५) च्या तरतुदींच्या अनुषंगाने याद्वारे सूचना देण्यात येते की, सात वर्षांच्या कालावधीकरिता प्रदान न केलेले किंवा दावा न केलेले सर्व लाभांश कंपनीद्वारे केंद्र शासनाने स्थापित केलेल्या गुंतवणुकदार प्रशिक्षण आणि संरक्षण निधी (आयईपीएफ)ला हस्तांतरित करणे आवश्यक आहे. आयईपीएफला हस्तांतरित करण्याआधी आम्ही नियमितपणे आमच्या वेबसाईटवर तसेच कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय, भारत सरकारच्या वेबसाईटवर अशा प्रदान न केलेल्या किंवा दावा न केलेल्या लाभांशांचे संपूर्ण तपशील अपलोड करतो.

तसेच, कलम १२४(६) नुसार, प्रदान न केलेल्या किंवा दावा न केलेल्या लाभांशांसंबंधीचे सर्व समभाग आयईपीएफला हस्तांतरित करणे आवश्यक आहे. कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने गुंतवणुकदार प्रशिक्षण आणि संरक्षण निधी प्राधिकरण (लेखा, लेखापरिक्षण, हस्तांतरण आणि परतावा) नियमन, २०१६ (नियमन) अधिसूचित केले, जे दि. ७ सप्टेंबर, २०१६ पासून अंमलात आले आणि त्यानंतर दि. २८ फेब्रुवारी, २०१७ रोजी अधिसूचनेद्वारे सुधारित करण्यात आले. सदर नियमनामध्ये, इतर बाबींसोबत, सर्व समभाग, ज्यांचे लाभांश सलग सात किंवा त्यापेक्षा जास्त वर्षांकरिता प्रदान केलेले नाहीत किंवा मागणी केलेली नाही, आयईपीएफ खात्याच्या नावे हस्तांतरित करण्याकरिता तरतुद समाविष्ट आहे.

नोंदींनुसार, वित्तीय वर्ष २०१०-२०११ करिता, तुम्ही सलग सात वर्षांकरिता तुमचे लाभांश प्राप्त केलेले नाहीत आणि त्यामुळे, वरील नियमनांनुसार, तुमचे समभाग आयईपीएफला हस्तांतरित करण्यास पात्र आहेत. तुम्हाला विनंती करण्यात येते की, आवश्यक दस्तऐवज, जसे १. कंपनीचे नाव, २. फोलियो क्र. किंवा डीपी आणि क्लायंट आयडी, ३. भागधारकाचे नाव, ४. संपर्क क्र., ५. ईमेल आयडी पाठवून, तुमच्या प्रदान न केलेल्या लाभांशावर दि. ३० जुलै, २०२४ रोजी किंवा त्यापूर्वी दावा करावा आणि तुमचे समभाग आयईपीएफला हस्तांतरित होणे टाळावे. भागधारकाचे पॅन, रद्द केलेले धनादेशाचे पृष्ठ, तसेच कंपनी/आरटीएच्या पत्त्याचा पुरावा म्हणून अद्यतन युटिलिटी बिल यांसारखी भागधारकाचे स्वयं-साक्षांकित केवायसी दस्तऐवज देखील प्रदान करावे. नियमनांमध्ये नमूद केलेल्या विविध आवश्यकतांचे पालन करताना, कंपनीने संबंधित भागधारक, ज्यांचे समभाग सदर नियमनांअंतर्गत आयईपीएफ सस्पेन्स खात्यास हस्तांतरित होण्यास पात्र आहेत, त्यांना योग्य कारवाई करण्याकरिता स्वतंत्ररित्या कळविण्यात आले आहे/कळविण्याचे सर्व प्रयत्न केले आहेत. कंपनीने अशा भागधारकांचे आणि आयईपीएफ खात्यास हस्तांतरित करावयाच्या समभागांचे संपूर्ण तपशील त्यांच्या वेबसाईट www.jyotistructures.in येथे अपलोड केले आहेत. तसेच, आम्ही भागधारकांना, ज्यांनी त्यांचे ईमेल आयडी नोंदविलेले नाहीत, त्यांना विनंती करतो की, त्यांनी कृपया ते कंपनी/आरटीएकडे आयडी/पत्त्याच्या पुराव्यासह त्यांचे फोलियो तपशील investor@bigshareonline.com/investor@jsl.co.in येथे मेल द्वारे पाठवून नोंदवावे.

ज्योती स्ट्रक्चर्स लिमिटेडकरिता
सही/-
अब्दुल हमीद कान
पूर्णवेळ संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी
डीआयएनः ०९५०८०७०

ठिकाण: मुंबई
दिनांक: २४.०६.२०२४

विन सेमिकंडक्टर्स प्रायव्हेट लिमिटेड

सीआयएन: U40109MH2009PTC195643
नोंद. पत्ता: ३०६/३०७, मॅरेथॉन मॅक्स, एलबीएस मार्ग, निर्मल लाईफस्टाईलसमोर, मुलुंड (पश्चिम), मुंबई - ४०००८० महाराष्ट्र.

विक्री सूचना

नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६ अन्वये कॉर्पोरेट दिवाळखोरी ठराव प्रक्रियेअंतर्गत असलेल्या कॉर्पोरेट ऋणको विन सेमिकंढक्टर्स प्रायव्हेट लिमिटेढ ('कॉर्पोरेट ऋणको')च्या साठ्याची (कच्चा माल आणि तयार वस्तू) विक्री
ई-लिलावाचा दिनांक आणि वेळ: २३ जुलै, २०२४ रोजी स. ११.०० ते दु. ०२.००
(प्रत्येकी १० मिनिटांच्या अमर्यादित विस्तारासह)

कॉर्पोरेट ऋणको हे कार्यात्मक प्रकाशयोजना उपकरणांच्या संपूर्ण श्रेणीकरिता प्रकाशयोजना उपायांचे उत्पादन/पुरवठा यामध्ये कार्यरत आहेत. साठ्यामध्ये प्रकाशयोजना उपायांच्या उत्पादनांमध्ये वापरण्यात येणारा कच्चा माल आणि तयार वस्तु, म्हणजेच, एलईडी, ट्यूब लाईट, बल्ब, कनेक्टर-मेल/फीमेल, आणि बेटा वॉल वॉशर इ. समाविष्ट आहे. सदर विक्री सूचना माननीय राष्ट्रीय कंपनी कायदे न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ यांच्याद्वारे सी.पी. २९९/२०२३ मधील दिनांक १० नोव्हेंबर, २०२३ रोजीच्या आदेशानुसार नियुक्त परिसमापकाद्वारे कॉर्पोरेट ऋणकोच्या साठ्याच्या (कच्चा माल आणि तयार वस्तू) विक्रीकरिता प्रसिद्ध करण्यात येत आहे. विक्री निम्नस्वाक्षरीकाराद्वारे ई-लिलाव प्लॅटफॉर्म **https://eauctions.co.in** (लिंकस्टार इन्फोसिस प्रायव्हेट लिमिटेढ) मार्फत करण्यात येईल.

ब्लॉक	संपत्तीचा तपशील:	राखीव किंमत	इसारा रक्कम अनामत	विस्तारयोग्य मूल्य
I	तयार वस्तू आणि कच्च्या मालाच्या किंमतीनुसार संपूर्ण स्टॉक	५८,०४,५१७.७३	५,८०,०००.००	५०,०००.००
II	सर्व तयार वस्तू	३५,७५,४८८.७०	३,५०,०००.००	५०,०००.००
III	सर्व कच्चा माल	२२,२९,०२९.००	२,२०,०००.००	५०,०००.००

टीप: ब्लॉक्सची तपशिलवार यादी प्रक्रिया दस्तऐवजामध्ये उल्लेखिली आहे

विक्री वेळापत्रक

अ.क्र.	कार्यक्रम	दिनांक
१	प्रसिद्धीचा दिनांक	२६ जून, २०२४
२	विक्री प्रक्रियेमध्ये सहभागी होण्याकरिता स्वारस्य अभिव्यक्तीच्या सादरीकरणाकरिता अंतिम दिनांक	१० जुलै, २०२४
३	बोलीदाराद्वारे पाहणी	११ जुलै, २०२४ ते १८ जुलै, २०२४
४	ईएमडी रक्कम सादरीकरणाकरिता अंतिम दिनांक	२० जुलै,, २०२४
५	लिलाव	२३ जुलै, २०२४

विक्रीच्या अटी आणि शर्ती खालीलप्रमाणे:

१. ई-लिलाव "जसे आहे जेथे आहे" तत्त्वावर घेण्यात येईल. कारण ही विक्री कोणत्याही प्रकारच्या हमी आणि नुकसानभरपाईशिवाय असेल. सदर विक्री **ई-लिलाव एजन्सी (लिंकस्टार)**च्या वतीने लिंकस्टार इन्फोसिस प्रायव्हेट लिमिटेड यांच्या मार्फत घेण्यात येईल. **संपर्क व्यक्ती: श्री. दीक्षित प्रजापती, ईमेल - admin@eauctions.co.in, मोबाईल क्र.: +९१ ९८७००९९७१३.** २. पात्रता दस्तऐवज परिसमापकास ईमेलद्वारे आणि हार्ड कॉपी तपशीलवार ई-लिलाव प्रक्रिया दस्तऐवजामध्ये विहीत नमुन्यामध्ये दि. १० जुलै, २०२४ रोजी किंवा त्यापूर्वी सादर करावे. संपूर्ण ई-लिलाव प्रक्रियेच्या तपशीलवार अटी आणि शर्तीसह बोली अर्ज वेबसाईट **https://eauctions.co.in** येथून डाऊनलोड करता येईल. ३. असे स्पष्ट करण्यात येते की, सदर आमंत्रणाचा हेतू संभाव्य बोलीदारांना आमंत्रित करणे आहे आणि याद्वारे परिसमापक किंवा कंपनीवर विक्री प्रभावी करण्याच्या दायित्वाचे बंधन नाही. परिसमापक कोणतेही कारण न दर्शविता आणि कोणत्याही दायित्वाशिवाय प्रक्रिया रद्द करण्याचे किंवा बदलण्याचे आणि/किंवा कोणत्याही इच्छुक पक्षकारास/संभाव्य गुंतवणुकदार/बोलीदारास न स्वीकारण्याचे आणि/किंवा अपात्र करण्याचे हक्क राखून ठेवीत आहेत. ४. ईएमडी सादर करण्यापूर्वी आणि प्रक्रियेमध्ये सहभागी होण्यापूर्वी सर्व अटी आणि शर्ती अनिवार्यपणे तपशीलवारपणे ई-लिलाव प्रक्रिया दस्तऐवजामधून पहाव्या. परिसमापकास **vinled.cirp@gmail.com** येथे संपर्क साधता येईल.

सीए प्रशांत जैन
ठराव व्यावसायिक - विन सेमिकंढक्टर्स प्रायव्हेट लिमिटेढ
आयबीबीआय नोंद क्र.: **IBBI/IPA-001/IP-P01368/2018-2019/12131**
ईमेल आयढी: **ipprashantjain@gmail.com; vinled.cirp@gmail.com**
पत्रव्यवहाराचा पत्ता: स्सार्वी रिझॉल्यूशन सर्व्हिसेस एलएलपी, बी-६१०, बीएसईएल टेकपार्क, सेक्टर ३०ए, वाशी, नवी मुंबई - ४००७०३. संपर्क क्र. +९१ ९०८२६०७७०३ (व्हॉट्सॲपवर संपर्क करावा)

दिनांक: २६.०६.२०२४
ठिकाण: नवी मुंबई

फॉर्म ए
जाहीर उद्घोषणा

(भारतीय नादारी आणि दिवाळखोरीपणा मंडळ (कॉर्पोरेट व्यक्तींकरिता दिवाळखोरी ठराव प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ६ अन्वये)

केसर मल्टीमोडल लॉजिस्टिक्स लिमिटेडच्या धनकोंचे लक्ष वेधण्याकरिता

संबंधित तपशील		
१.	कॉर्पोरेट कर्जदाराचे नाव (सीडी)	**केसर मल्टीमोडल लॉजिस्टिक्स लिमिटेड**
२.	कॉर्पोरेट कर्जदाराच्या स्थापनेचा दिनांक	३०.०९.२०११
३.	प्राधिकरण ज्या अंतर्गत कॉर्पोरेट कर्जदाराची स्थापना/नोंदणीकरण झाले	कंपनी निबंधक, मुंबई
४.	कॉर्पोरेट कर्जदाराचा कॉर्पोरेट ओळख क्र.	U74120MH2011PLC222597
५.	कॉर्पोरेट कर्जदाराच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि प्रमुख कार्यालयाचा (जर असल्यास) पत्ता	**नोंद. कार्यालयः** ओरिएंटल हाऊस ७, जमशेदजी टाटा रोड, चर्चगेट, मुंबई, महाराष्ट्र, भारत, ४०००२०.
६.	कॉर्पोरेट कर्जदाराच्या संदर्भात दिवाळखोरी सुरु होण्याचा दिनांक	२१.०६.२०२४ (आदेशाची प्रत दि. २१.०६.२०२४ अंतरिम ठराव व्यावसायिकांना दि. २४.०६.२०२४ रोजी प्राप्त)
७.	दिवाळखोरी ठराव प्रक्रिया परिसमाप्तीचा अंदाजित दिनांक	१८.१२.२०२४ (दि. २१.०६.२०२४ पासून १८० वा दिवस)
८.	अंतरिम ठराव व्यावसायिक म्हणून काम पाहणाऱ्या दिवाळखोरी व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणीकरण क्रमांक	**नावः श्री. प्रशांत जैन** **नोंदणीकरण क्र.** IBBI/IPA-001/IP-P01368/2018-2019/12131
९.	मंडळाकडे नोंदणीकृत असल्यानुसार, अंतरिम ठराव व्यावसायिकाचा पत्ता आणि ईमेल	**नोंद. पत्ताः** ए५०१, शांती हाईट्स, प्लॉट क्र. २, ३, ९बी/१०, सेक्टर ११, कोपरखैराणे, ठाणे, नवी मुंबई - ४००७०९. **ईमेल आयडीः** ipprashantjain@gmail.com
१०.	अंतरिम ठराव व्यावसायिकासह पत्रव्यवहाराकरिता वापरावयाचा पत्ता आणि ईमेल	**द्वारा स्सार्व्ही रिझॉल्युशन सर्व्हिसेस एलएलपी** **पत्ताः** बी-६१०, बीएसएनएल टेकपार्क, सेक्टर ३०ए, वाशी रेल्वे स्टेशनसमोर, नवी मुंबई - ४००७०३. **वेबसाईटः** www.ssarvi.com/ **ईमेलः** kmll.cirp@gmail.com
११.	दावे सादर करण्याचा अंतिम दिनांक	०८.०७.२०२४, (दि. २४.०६.२०२४ पासून १४ वा दिवस)
१२.	अंतरिम ठराव व्यावसायिकाद्वारे निश्चित केल्यानुसार, कलम २१ च्या उप-कलम (६अ) च्या खंड (ब) अन्वये धनकोचे वर्ग, जर असल्यास.	लागू नाही
१३.	वर्गामध्ये धनकोचा प्राधिकृत प्रतिनिधी म्हणून काम करण्याकरिता ठरविण्यात आलेल्या दिवाळखोरी व्यावसायिकांची नावे (प्रत्येक वर्गामध्ये तीन नावे)	लागू नाही
१४.	(अ) संबंधित अर्ज आणि (ब) अधिकृत प्रतिनिधींचा तपशील उपलब्ध असेलः	https://www.ibbi.gov.in/home/downloads लागू नाही

याद्वारे सूचना देण्यात येते की, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ यांनी दिनांक २१.०६.२०२४ रोजी केसर मल्टीमोडल लॉजिस्टिक्स लिमिटेडची कॉर्पोरेट दिवाळखोरी ठराव प्रक्रिया सुरु करण्याचे आदेश दिले होते. (आयआरपीद्वारे आदेश दि.२४.०६.२०२४ रोजी प्राप्त)
केसर मल्टीमोडल लॉजिस्टिक्स लिमिटेडच्या धनकोंना याद्वारे त्यांचे दावे पुराव्यासह दि. ०८.०७.२०२४ रोजी किंवा त्यापूर्वी अंतरिम ठराव व्यावसायिक यांच्याकडे नोंद क्र. १० समोर नमूद पत्त्यावर सादर करण्यास सांगण्यात येत आहे.
आर्थिक धनको यांनी दाव्याबाबतचे त्यांचे पुराव्यासहीत दावे फक्त इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करावे. इतर सर्व धनको त्यांचे दाव्याबाबतचे पुरावे व्यक्तिशः, टपालाद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करू शकतात.
दाव्याबाबतचे चुकीचे किंवा दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड ठोठावण्यात येईल.

सही/-
श्री. प्रशांत जैन
नोंद. क्रमांक: IBBI/IPA-001/IP-P01368/2018-2019/12131
एएफए वैधता दि. २४ सप्टेंबर, २०२४ पर्यंत वैध
केसर मल्टीमोडल लॉजिस्टिक्स लिमिटेडच्या प्रकरणात
अंतरिम ठराव व्यावसायिक

दिनांक: २६.०६.२०२४
ठिकाण: मुंबई